मस्का चाळ उत्सवाला भक्तीसोबत माणुसकीची जोड

चेंबूरमध्ये जगदंबा भक्तांचा रुग्णसेवेचा वसा

शिरीष पवार / मुंबई

चेंबूरमधील मस्का चाळ सार्वजनिक शारदीय नवरात्रौत्सवाची सुवर्ण महोत्सवी वाटचाल सुरू असून मंडळाने शैक्षणिक मदतीबरोबरच प्रामुख्याने रुग्णसेवेचा वसा समर्थपणे चालवला आहे.

दत्त स्मृती क्रीडा मंडळ आणि आई जगदंबा न्यास यांच्या विद्यमाने उत्सव साजरा केला जातो. मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते वर्षभर परिसरातील विद्यार्थी आणि गरजू रुग्णांच्या सेवेसाठी हरप्रकारे झटत असतात. दसरा झाला की शालेय विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी शैक्षणिक साहित्याचे वाटप सुरू होते. आजारी व्यक्तींना रुग्णालयात दाखल करण्यापासून ते औषधोपचार आदी मदत केली जाते. डॉक्टर अजित गावडे हे वैद्यकीय व्यावसायिक मंडळाचे कार्यकर्ते आहेत. त्यांच्या पुढाकार आणि मार्गदर्शनाखाली प्रामुख्याने डायलिसिसवरील रुग्णांना मदत केली जाते. मंडळाचे आणखी एक क्रियाशील कार्यकर्ते योगेश चव्हाण यांनी नवशक्तीला सांगितले की, चेंबूरमध्ये सवलतीच्या दरात उपचार करता यावेत म्हणून डायलिसिसचे युनिट सुरू करण्याचा प्रयत्न आहे. महानगरपालिका आणि आरसीएफ यांची मदत मिळावी म्हणून प्रयत्नशील आहोत. डायलिसिस युनिटसाठी जागासुद्धा पाहिली आहे. तेथे तीस ते चाळीस टक्के अल्प दरात सुविधा देण्याचा आमचा मानस आहे. विष्णू लक्ष्मण चव्हाण यांनी पन्नास वर्षांपूर्वी लहानशा स्वरूपात हा उत्सव सुरू केला. शेखर चव्हाण हे मंडळाचे अध्यक्ष, तर जितेंद्र देसाई सरचिटणीस, रफिक मोहम्मद शेख हे सचिव आणि महेश देसाई हे कोषाध्यक्ष आहेत.

वाराणसीच्या लाल मंदिराची अनुभूती

मंडळाची देवीची मूर्ती आणि अत्यंत कलात्मक सजावट हे भाविकांचे प्रमुख आकर्षण ठरले आहे. देश विदेशातील प्रसिद्ध देवालयांच्या प्रतिकृती साकारण्याची मंडळाची ख्याती आहे. दोन वर्षांपूर्वी येथे कंबोडियातील विष्णू मंदिर साकारण्यात आले होते. यावर्षी प्रवेशद्वार, सभामंडप आणि गाभारा अशा सर्व ठिकाणी वाराणसी येथील दुर्गा मातेच्या सुप्रसिद्ध लाल मंदिराची अनुभूती मिळते. मंडळाची देवीची मूर्ती साडेसहा फुटांची असून ती मूर्तिकार बाबी बांदेकर यांनी घडविली आहे.

जागर आदिशक्तीचा

वाहनतळ हडपणाऱ्यांवर कारवाई

■ पालिका आयुक्तांचे आदेश ■ अन्य कारणांसाठी होणारा वापर थांबणार

मुंबई : मुंबईत शॉपिंग मॉल्स, उपाहारगृहे, व्यापारी संकुले आदी व्यावसायिक आस्थापनांनी इमारत बांधकाम परवाना घेताना वाहनतळाची तजवीज दाखवून महानगरपालिकेची परवानगी घेतली आहे. मात्र, काही ठिकाणी वाहनतळांच्या जागा बंदिस्त करून त्याचा व्यावसायिक वापर केला जात आहे. त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचे आदेश महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी प्रशासनाला दिले आहेत.

गगराणी यांनी मंगळवारी अधिकाऱ्यांना बजावले की, वाहनतळाच्या जागांचा इतर कारणांसाठी केला जाणारा वापर रोखायला हवा. या कामी शहर अभियंता व संबंधित विभागांचे सहाय्यक आयुक्त यांनी संयुक्तपणे स्थळ पाहणी करावी. त्यानंतर तत्काळ कठोर कारवाई करावी.

अधिकाऱ्यांच्या बैठकीत सशुल्क वाहनतळांबाबत (पे ॲण्ड पार्क) चर्चा करताना गगराणी म्हणाले की, महानगरपालिकेच्या माध्यमातून मध्य मुंबई, पश्चिम मुंबईत मोठ्या प्रमाणावर वाहनतळ सुविधा उपलब्ध केली जाणार आहे.

वाहनतळाच्या माध्यमातून महसूल संकलन करणे हा महानगरपालिकेचा उद्देश नसून नागरिकांना वाहनतळ सुविधा विनासायास उपलब्ध करणे हा हेतू आहे.

नागरिकांच्या सुविधेसाठी मोबाईल ॲप विकसित केला जात आहे.

वाहनतळ सुविधेबरोबरच बेकायदा वाहनतळ, रस्त्यांवर वाहने लावून वाहतुकीस अडथळा करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई केली पाहिजे. त्यासाठी वाहतूक पोलिसांची मदत घेतली पाहिजे. विभाग कार्यालय, पोलीस अंमलदार आणि महानगरपालिकेची वाहतूक मध्यवर्ती यंत्रणा आदींनी समन्वयाने सातत्याने कारवाई करावी, जेणेकरून वाहतुकीस शिस्त लागेल.

अतिक्रमणांवर सुटीच्या दिवशीही कारवाई

उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत फेरीवाले, बेवारस वाहने, पदपथावरील अतिक्रमणे यांवर कठोर करावी. रेल्वे स्थानके, पदपथ, उड्डाणपूल, वर्दळीची ठिकाणे फेरीवालेमुक्त करावीत. पदपथांवरील अतिक्रमण हटविण्याच्या मोहिमेला वेग द्यावा, प्रसंगी पोलिसांची मदत घ्यावी. अतिक्रमण निर्मूलन कारवाई करताना प्रभाग कार्यालयातील तसेच विविध खात्यांनी एकत्रितपणे व समन्वयाने मोहीम राबवावी. केवळ दिवसाच नव्हे तर रात्रीच्या कालावधीत तसेच शनिवार व रविवारीदेखील नियमितपणे कारवाई करावी. वर्दळीच्या ठिकाणी कारवाईत सातत्य ठेवावे. महानगरपालिका हद्दीत आढळून येणारी बेवारस व भंगार वाहने हटविण्याची नियमाधीन कारवाई करावी, असे देखील निर्देशही आयुक्तांनी दिले आहेत.

सुविधा भूखंडांसाठी धोरण

महानगरपालिका हद्दीतील काही सुविधा भूखंड (ॲमिनिटी स्पेस) महानगरपालिकेच्या ताब्यात आले आहेत. हे सुविधा भूखंड थेट कोणासही देता कामा नयेत. त्यासाठी सर्वसमावेशक व सर्वव्यापी धोरण तयार करण्यात यावे. महानगरपालिकेचा निधी न वापरता सुविधा भूखंडाचा विकास कशाप्रकारे करता येईल, याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल.

पाणीचोरी रोखण्यासाठी भरारी पथक

गगराणी म्हणाले की, मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणात आजमितीला ९८ टक्के साठा आहे. ही समाधानकारक बाब आहे. पाण्याची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. पाण्याची मागणी आणि पुरवठा यांची सांगड घालून सुनियोजन केले पाहिजे. बिगर महसूल पाण्याचे (नॉन वॉटर रेव्हेन्यू) प्रमाण ३८ टक्क्यांवरून ३४ टक्क्यांपर्यंत आले असले तरी त्यात आणखी घट व्हायला हवी. पाणीगळती रोखण्याबरोबरच अनधिकृत नळजोडण्यांवर कारवाई करावी. यासाठी स्वतंत्र भरारी पथक नेमावे. पालिकेच्या उत्पन्नवाढीसाठी प्रयत्न करावेत.

१२ आमदारांच्या नियुक्त्यांचा तिढा सुटणार

न्यायालयाने निर्णय राखून ठेवला

मुंबई : विधानपरिषदेतील राज्यपाल नियुक्त १२ आमदारांच्या गेली चार वर्षे न्यायालयीन कचाट्यात अडकलेल्या नियुक्त्यांचा तिढा लवकरच सुटण्याची चिन्हे आहेत. याप्रकरणी दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठासमोर दोन्ही बाजूची सुनावणी पूर्ण झाल्यानंतर खंडपीठाने निर्णय राखून ठेवला. तो २३ ऑक्टोबरला जाहीर होण्याची शक्यता आहे.

विधान परिषदेवरील १२ आमदारांच्या नियुक्त्या गेल्या तीन वर्षांपासून रखडल्या आहेत. महाविकास आघाडी सरकारने नावांची शिफारस करून तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्याकडे तशी यादी पाठवली. कोश्यारी यांनी त्या यादीवर वेळीच निर्णय घेतला नाही. यादी जाणूनबुजून रखडवली. ही कृती राज्यघटनेच्या विरुद्ध आहे. असा दावा करत या आमदारांच्या नियुक्त्या करण्यात राज्य सरकार चालढकलपणा करत आहे असा आरोप करून शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) कोल्हापूर शहर प्रमुख सुनील मोदी यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. हस्तक्षेप करणारी याचिका माजी आमदार राजेश क्षीरसागर यांनी केली आहे.

प्रकरण काय?

विधानपरिषदेवरील १२ आमदारांच्या नियुक्त्या चार वर्षांपासून रखडल्या आहेत. महाविकास आघाडी सरकारने नावांची शिफारस करून तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्याकडे तशी यादी पाठवली होती. कोश्यारी यांनी त्या यादीवर वेळीच निर्णय घेतला नाही, यादी जाणूनबुजून रखडवली. नंतर राज्य सरकारने नियुक्ती प्रक्रियेत खो घातला . महाविकास आघाडी सरकारने शिफारस केलेल्या नावांची यादी तत्कालीन राज्यपाल कोश्यारी यांच्याकडून परत मागितली. आणि नव्याने यादी पाठविली. दरम्यान उच्च न्यायालयात याचिका प्रलंबित असल्याने खंडपीठाने आमदारांच्या नियुक्त्या तुर्तास करून नका असा आदेश राज्य सरकारला दिला. यामुळे या नियुक्त्या रखडल्या होत्या. आज या याचिकेवर सुनावणी पूर्ण झाल्यानंतर खंडपभठाने निर्णय २३ ऑक्टोंबर पर्यंत राखून ठेवला .

दहा आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

अतिरिक्त आयुक्त अभिषेक त्रिमुखे यांची उत्तर विभागात नियुक्ती

मुंबई : राज्यातील दहा आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदलीचे आदेश जारी करण्यात आले आहे. त्यात दोन अतिरिक्त पोलीस आयुक्त आणि आठ पोलीस उपायुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांचा समावेश आहे. उत्तर प्रादेशिक विभागाच्या अतिरिक्त पोलीस आयुक्त म्हणून अभिषेक त्रिमुखे यांची नियुक्ती करण्यात आली तर त्यांची जागी असलेल्या राजीव जैन यांची राज्य राखीव पोलीस दलाच्या पोलीस महानिरीक्षक म्हणून बदली करण्यात आली आहे.

उत्तर प्रादेशिक विभागाचे अतिरिक्त पोलीस आयुक्त राजीव जैन यांची राज्य राखीव पोलीस दलाच्या पोलीस उपमहानिरीक्षक, सशस्त्र विभागाचे अतिरिक्त पोलीस आयुक्त अभिषेक त्रिमुखे यांची उत्तर प्रादेशिक विभागाचे अतिरिक्त पोलीस आयुक्त, बंदर परिमंडळाचे पोलीस उपायुक्त संजय लाटकर, परिमंडळ सहाचे पोलीस उपायुक्त हेमराज राजपूत यांची सायबर सेलच्या पोलीस अधीक्षक, परिमंडळ चारचे पोलीस उपायुक्त प्रशांत कदम यांची अनुसूचित जाती-जमाती आयोगाच्या पोलीस अधीक्षक, नागपूरच्या राज्य गुप्तवार्ता विभागाचे पोलीस उपायुक्त संदीप भाजीभाकरे यांची पुणे पोलीस उपायुक्त, ठाणे शहराचे पोलीस उपायुक्त शिवराज पाटील यांची ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस अधीक्षक आणि वाशिमचे अप्पर पोलीस अधिक्षक भरत तांगाडे यांची ठाण्याच्या अप्पर पोलीस अधीक्षकपदी बदली करण्यात आली आहे. ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक सुनील लोखंडे यांचीही बदली करण्यात आली आहे.



म्हाडाच्या २०३० घरांच्या विक्रीची आज लॉटरी

मुंबई : म्हाडाच्या मुंबई मंडळातर्फे मुंबईतील विविध गृहनिर्माण योजनांतर्गत उभारण्यात आलेल्या २ हजार ३० घरांची लॉटरी मंगळवारी काढण्यात येणार आहे. लॉटरीसाठी १ लाख १३ हजार ८११ अर्ज प्राप्त झाले असून या अर्जांची ऑनलाईन लॉटरी ८ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० वाजता नरिमन पॉइंट येथील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते काढण्यात येणार आहे.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या प्रमुख उपस्थितीत काढण्यात लॉटरीत सहभाग घेतलेल्या अर्जदारांची संख्या लक्षात घेता मंडळातर्फे व्यापक नियोजन करण्यात आले आहे.

तसेच अर्जदारांना सोयीस्कररीत्या निकाल पाहता यावा याकरिता सभागृहाच्या आवारात व सभागृहात एलईडी स्क्रीन लावण्यात येणार आहे.

तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सोडत

अर्जदारांना 'वेबकास्टिंग' तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सोडतीच्या कार्यक्रमाचे घरबसल्या थेट प्रक्षेपण बघण्याची सुविधा म्हाडाच्या @mhadaofficial या यूट्यूब चॅनल व फेसबूक पेजवरून करण्यात येणार आहे. वेबकास्टिंगची लिंक म्हाडाच्या https://housing.mhada.gov.in या वेबसाइटवर व समाजमाध्यम व्यासपीठांवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. विजेत्या अर्जदारांची यादी म्हाडाच्या https://housing.mhada.gov.in या वेबसाइटवर सायंकाळी ६.०० वाजता प्रसिद्ध केली जाणार असून विजेत्या अर्जदारांना एसएमएसद्वारेही विजेता ठरल्याबाबतची माहिती तत्काळ कळविली जाणार आहे.

INDIA'S BEST PERFORMING PORT
जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण
(बंदर नियोजन आणि विकास विभाग)

संक्षिप्त ई-निविदा सूचना

निविदा क्र.: पीपीडी/डीजीएम-एक / पाणी पुरवठा वाहिनी / टी-34/2024 दिनांक 26.09.2024

जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण **"जेएन पोर्ट टाऊनशिप येथील एचडीपीई पाइपलाइनद्वारे विद्यमान सीआय पाइपलाइन बदलून पाणीपुरवठा प्रणाली अद्ययावत /सुधारित करणे आणि जेएन पोर्ट टाउनशिपमध्ये आरसी बॉक्स नाल्याचे बांधकाम करणे"** या कामासाठी निविदेमध्ये करार निविष्ट केलेल्या "किमान पात्रता निकषांची" पूर्तता करणाऱ्या अनुभवी कंत्राटदारांकडून दिनांक **08.10.2024 पासून 29.10.2024** पर्यंत दोन लिफाफ्यांमध्ये टक्केवारी दर तत्वावर **"ऑनलाइन"** निविदा मागवीत आहे.

कामाचा अंदाजित खर्च: **रु. 12,21,20,000.00/-** इतका आहे. परिपूर्ण इ-निविदा दिनांक 29.10.2024 रोजी 1500 वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी **"ऑनलाइन"** प्रक्रीयेद्वारे सादर कराव्या लागतील. निविदा दस्तऐवजाच्या समावेशासह निविदा मागविण्याची तपशीलवार सूचना जेएनपीएच्या "www.jnport.gov.in किंवा https://eprocure.gov.in" या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे.

मुख्य महाव्यवस्थापक
(बंदर नियोजन आणि विकास विभाग)

SASF एसएएसएफ
स्ट्रेस्ड असेट्स स्टॅबिलायझेशन फंड (एसएएसएफ)
तिसरा मजला, आयडीबीआय टॉवर, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, कुलाबा, मुंबई 400 005.

बोली सूचना

विषय:- रेकॉर्डचे स्कॅनिंग आणि डिजिटायझेशनसाठी सेवा प्रदात्याच्या निवडीसाठी प्रस्तावासाठी विनंतीचे आमंत्रण.

एसएएसएफद्वारे **"रेकॉर्ड्सचे स्कॅनिंग आणि डिजिटलायझेशनसाठी सेवा प्रदात्याच्या"** निवडीसाठी प्रस्तावाची विनंती आमंत्रित करत आहे. तपशीलवार आवश्यकता, अटी आणि शर्ती असलेल्या प्रस्तावाची विनंती एसएएसएफच्या वेबसाइट: **www.sasftrust.com** वर उपलब्ध आहे.

बोली सादर करण्याची अंतिम तारीख:- **१५ ऑक्टोबर २०२४ रोजी सायं. १६.०० वा. पर्यन्त आहे.** कोणतीही शुद्धीपत्र/दुरुस्ती केवळ वर नमूद केलेल्या वेबसाइटवर प्रकाशित केली जाईल.

कृपया अधिक तपशीलांसाठी **www.sasftrust.com** ला भेट द्या. काही शंका असल्यास कृपया नमूद दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा:- **०२२ ६६५५२०१२/ ०२२-६६५५२०१८.**

कोणतेही कारण न देता कोणत्याही किंवा सर्व बोली स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार एसएएसएफ राखून ठेवत आहे.

स्ट्रेस्ड असेट्स स्टॅबिलायझेशन फंड
सही /-
उपमहाव्यवस्थापक

सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया
Central Bank of India
CENTRAL TO YOU SINCE 1911

भाडेपट्ट्यावर जागेसाठी निविदा निमंत्रण

सेंट्रल बँक ऑफ इंडिया ला बँकेच्या शाखेसाठी भाईंदर आणि विष्णूनगर (डोंबिवली-ठाणे), ठाणे च्या आजूबाजूच्या क्षेत्रांत तयार ताबा/३ महिन्यांत ताब्यासाठी तयार होणाऱ्या पुरेशी आमच्या कार्यालयाकरिता पार्किंग जागा शक्यतो तळ मजल्यावर मोजमापित १११.४८ ते १६७.२३ चौ. मी. (१२०० ते १८०० चौ. फू.) आवश्यकता आहे. दलाल किंवा मध्यस्थ क्षमस्व. सरकारी/निम-सरकारी मंडळे किंवा सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम यांना प्राधान्य दिले जाईल. कृपया नमुना प्रपत्रे/अटी आणि शर्ती वेबसाईट http://www.centralbankofindia.co.in वरून डाऊनलोड कराव्यात किंवा सेंट्रल बँक ऑफ इंडिया, ठाणे क्षेत्रीय कार्यालय, ४था मजला, मराठी ग्रंथ संग्रहालय बिल्डिंग, स्टेशन रोड, ठाणे पश्चिम येथून कार्यालयीन वेळेमध्ये प्राप्त कराव्यांत. प्रस्ताव सादर करण्यासाठी अंतिम तारीख आहे २२.१०.२०२४ रोजी सायं. १७.०० वा. पर्यंत.

क्षेत्रीय प्रमुख
दिनांक : ०८.१०.२०२४ क्षेत्रीय कार्यालय, ठाणे

Jai Hind College
Basantsing Institute of Science & J.T. Lalvani College of Commerce & Sheila Gopal Raheja College of Management
Autonomous
A Road, Churchgate, Mumbai – 400 020.

Affiliated to University of Mumbai, Approved by AICTE, Recognized by DTE, Government of Maharashtra (DTE Code: 03579)

ADMISSION NOTICE 2024-25

First Year Bachelor of Management Studies (BMS) and First Year Bachelor of Business Administration (BBA)

Applications are invited in a prescribed format from eligible candidates for admission to First Year Bachelor of Management Studies (BMS) and First Year Bachelor of Business Administration (BBA) against 20% institute level seats , vacant seats after Government CAP round (if any) and seats available against cancellation(if any).

Eligibility: As prescribed by Government of Maharashtra State, Entrance cell. As per the notified rules candidate aspiring for admission for have to visit at the facilitation centre and submit the application form along with the documents in the college office between 10am – 2pm on all working days within 10 days from the date of publication of this advertisement till 18th Oct 2024. Complete application form to be submitted at the college office only by the applicant. Incomplete applications or applications received after due date will be rejected without assigning any reason. Admissions will be as per guidelines prescribed by Government of Maharashtra, State Government Entrance Cell as per information brochure for the academic year 2024-25.For details visit college website and notice board.

Sd/-
Principal
Jai Hind College

राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायासन खंडपीठ, मुंबई येथे

LIGHTHOUSE LEARNING

सी.पी.(सीएए)/158/एमबी/2024
सी.ए.((सीएए)/76/एमबी/2024 याच्याशी संबंधित कंपनी कायदा, 2013 (2013 मधील 18) च्या प्रकरणी

आणि

कलम 230 ते 232 आणि कंपनी कायदा, 2013 मधील इतर लागू तरतुदी व त्या अंतर्गत तयार करण्यात आलेल्या व वेळोवेळी लागू असलेल्या कायद्यांच्या प्रकरणी

आणि

एन्लर्न एज्युकेशन प्रायव्हेट लिमिटेड (हस्तांतरण करणारी कंपनी) यांचे लाईटहाऊस लर्निंग प्रायव्हेट लिमिटेड मध्ये एकत्रिकरणाद्वारे विलिनिकरण (हस्तांतरण करून घेणारी कंपनी) आणि त्यांचे संबंधित भागधारक यांच्या विलिनिकरणाच्या प्रकरणी ('योजना')

एन्लर्न एज्युकेशन प्रायव्हेट लिमिटेड पहिली याचिकाकर्ता कंपनी /हस्तांतरण करणारी कंपनी
लाईटहाऊस लर्निंग प्रायव्हेट लिमिटेड दुसरी याचिकाकर्ता कंपनी /हस्तांतरण करून घेणारी कंपनी

कंपनी योजना याचिकेच्या सुनावणीची संलग्न नोटिस

लाईटहाऊस लर्निंग प्रायव्हेट लिमिटेड ('पहिली याचिकाकर्ता कंपनी /हस्तांतरण करणारी कंपनी') यांचे एन्लर्न एज्युकेशन प्रायव्हेट लिमिटेड ('दुसरी याचिकाकर्ता कंपनी /हस्तांतरण करून घेणारी कंपनी') मध्ये विलिनिकरण (एकत्रिकरणाद्वारे विलिनिकरण) आणि त्यांचे संबंधित भागधारक व क्रेडिटर्स यांच्या विलिनिकरणाच्या योजनेला मंजुरी देण्यासाठी सदर याचिकाकर्ता कंपन्यांनी कंपनी कायदा, 2013 मधील कलम 230 ते 232 अन्वये राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायासन, मुंबई खंडपीठ, (माननीय न्यायासन) यांचेसमोर 31 जुलै 2024 रोजी एक संलग्न याचिका सादर केली होती आणि कंपन्यांची प्रकरणे हाताळणाऱ्या माननीय न्यायासनासमोर 18 ऑक्टोबर 2024 रोजी दुपारी किंवा त्यानंतर लवकरच त्यांची अंतिम सुनावणी घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

या संलग्न याचिकेला पाठबळ देण्याची किंवा त्याला विरोध करण्याची इच्छा असलेल्या कोणाही व्यक्तीने त्याने/तिने किंवा त्याच्या/तिच्या वकिलाने स्वाक्षरी केलेली त्याच्या/तिच्या उद्दिष्टाची सूचना, संलग्न याचिकेच्या सुनावणीसाठी निश्चित करण्यात आलेल्या तारखेच्या दोन दिवस अगोदर, ज्यांचे कार्यालय, 16, ओरिएंटल बिल्डिंग, 30, नगिनदास मास्टर मार्ग, फ्लोरा फाउंटेन, फोर्ट, मुंबई-400 001, येथे असलेल्या याचिकाकर्त्यांचे वकिलांकडे पाठवावी व सदर सूचनेसोबत त्यांच्या हरकतीचे कारण किंवा प्रतिज्ञापत्राची प्रत जोडावी. कोणाही व्यक्तीला सदर संलग्न याचिकेची प्रत हवी असल्यास, त्यासाठी विहित शुल्क भरल्यास, याचिकाकर्त्यांचे वकिल ती सादर करतील.

दिनांक: 27 सप्टेंबर 2024

स्वाक्षरी/-
राजेश शहा ॲण्ड कंपनी,
याचिकाकर्त्यांचे वकिल